# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः04.07.2024** **वारःगुरुवार**

**ठळक बातम्या,**

1. देशाची राज्यघटना म्हणजे केंद्र सरकारसाठी मार्गदर्शक दीपस्तंभ – पंतप्रधानांचं प्रतिपादन
2. पुणे शहराला पाणी कमी पडू दिलं जाणार नाही-जलसंपदा मंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही
3. विधानपरिषदेत राज्यपालांच्या अभिभाषणाच्या आभाराचा प्रस्ताव एकमतानं मंजूर
4. पुण्यातील झिका विषाणू संसर्गाच्या पार्श्वभूमीवर सर्व राज्यांना मार्गदर्शक सूचना आणि
5. नीती आयोगाच्या आकांक्षित जिल्ह्यांसाठीच्या संपूर्णता अभियानाची राज्यात सुरुवात

**राज्यसभा**

राज्यघटना हे केवळ विविध कलमांचं संकलन नाही तर त्यातला प्रत्येक शब्द आणि त्याचा भावार्थ सरकारसाठी मौल्यवान आहे. राज्यघटना म्हणजे सरकारसाठी मार्गदर्शक दीपस्तंभच आहे असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल राज्यसभेत केलं.
राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावाला उत्तर देताना ते बोलत होते. संविधान दिवस साजरा करण्याला विरोध करणाऱ्यांवर त्यांनी कडाडून टीका केली. संविधान दिवस हा आता जनतेचा उत्सव आहे असं पंतप्रधान म्हणाले. राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळात दारिद्र्य दूर करण्याला सरकार प्राधान्य देईल असं त्यांनी सांगितलं. जनतेच्या कल्याणासाठी राबवल्या जाणाऱ्या योजनांचा वेग, व्याप्ती आणि प्रसार वाढवण्याला सरकारचं सर्वोच्च प्राधान्य असेल असं मोदी म्हणाले. मणिपूरमध्ये शांतता आणि सलोखा प्रस्थापित करण्यासाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकार सतत प्रयत्न करत आहे असं पंतप्रधानांनी सांगितलं. देशातल्या अन्य भागांप्रमाणेच मणिपूरमधल्या शाळा, महाविद्यालयं सुरू झाली असून परीक्षाही घेण्यात आल्या अशी माहिती त्यांनी दिली.पंतप्रधानांचं भाषण सुरु असतानाच काँग्रेससह अन्य विरोधी पक्षाच्या खासदारांनी गोंधळ घातला आणि नंतर सभात्याग केला. दरम्यान, राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर राज्यसभेचं कामकाज संस्थगित करण्यात आलं.

**विधीमंडळ**

पुणे शहराची वाढती लोकसंख्या, गावांची संख्या लक्षात घेऊन राज्य शासन पुणे शहराच्या पाणी पुरवठ्याकरता नवीन स्रोत निर्माण करण्यासाठी काम करत आहे असं सांगून कुठल्याही परिस्थितीत पुणे शहराला पाणी कमी पडू दिलं जाणार नाही अशी ग्वाही जलसंपदा मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत दिली. पुण्यात गळती होणाऱ्या 40 टक्के पाण्याची बचत समान पाणी वाटप योजनेच्या माध्यमातून केल्यावर 4 टीएमसी पाणी उपलब्ध होणार असल्याचं त्यांनी सांगितलं. सदस्य रविंद्र धंगेकर यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना फडणवीस यांनी ही माहिती दिली.राज्यातल्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन  त्यांना दोन हेक्टरच्या मर्यादेत प्रती हेक्टरी पाच हजार रुपये मदत देण्याची घोषणा पणन मंत्री अब्दुल सत्तार यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात केली. राज्यातल्या सर्व विद्यार्थ्यांना प्रत्येकी दोन गणवेश मोफत देण्याचा निर्णय घेतल्याचं शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी सांगितलं. 30 जुलैपर्यंत सर्व शाळांमध्ये गणवेश पोहोचतील, असं ते म्हणाले.महाराष्ट्र सेवा हमी योजनेचा आढावा मुख्यमंत्री घेतील, तसंच वेळेत काम न करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांच्यावर कारवाई केली जाईल, अशी माहिती प्रभारी मंत्री शंभुराज देसाई यांनी दिली.पारंपरिक पद्धतीनं मासेमारी करणाऱ्या मासेमारांना संरक्षण देण्यासाठी पर्ससीन आणि एलईडी पद्धतीनं मासेमारी करणाऱ्यांवर आर्थिक दंडासह गुन्हा दाखल केला जाईल, असं मत्स्य व्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितलं.विधानपरिषदेत काल राज्यपालांच्या अभिभाषणाच्या आभाराचा प्रस्ताव एकमतानं मंजूर झाला. तत्पूर्वी,

या प्रस्तावावर झालेल्या चर्चेला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिलं. राज्याची अर्थव्यवस्था वेगानं वाढत असून गुंतवणुकीच्या बाबतीतही राज्य अग्रेसर आहे. एक लाख कोटी डॉलर्सचं ध्येय पुढच्या 3 ते 5 वर्षांत गाठण्याच्या दृष्टीनं मार्गदर्शक आराखडा तयार असल्याचं त्यांनी सांगितलं.वाढवण बंदर राज्याच्या विकासात मोठी भूमिका बजावेल, ते तयार करताना मासेमार आणि स्थानिकांचं कोणतंही नुकसान होणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ एका घरातल्या जास्तीत जास्त दोनच महिलांना घेता येईल, असं त्यांनी स्पष्ट केलं.पटसंख्या कमी असलेल्या शाळा बंद करण्याचा सरकारचा कोणताही हेतू नाही, अशी ग्वाही शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी विधानपरिषदेत दिली.वीस षटकांच्या विश्वचषक स्पर्धेचं जेतेपद पटकावणाऱ्या भारतीय संघाचं अभिनंदन करण्याचा प्रस्ताव सभागृहानं एकमतानं मंजूर केला.

**सागरी-विद्यापीठ**

सागरी विद्यापीठ रत्नागिरीत उभारण्यास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल मंजुरी दिल्याची माहिती रत्नागिरीचे पालकमंत्री उदय सामंत यांनी काल पत्रकार परिषदेत दिली. रत्नागिरीत शासकीय विधी महाविद्यालय उभारण्यासही त्यांनी मंजुरी दिल्याचं सामंत म्हणाले. सागरी विद्यापीठासाठी पाचशे ते सहाशे कोटी रुपये, तर शासकीय विधी महाविद्यालयासाठी 25 कोटी रुपये खर्च अपेक्षित असल्याचं सामंत म्हणाले.

**झिका विषाणू**

पुणे शहरातील डहाणूकर कॉलनीमध्ये झिका विषाणूचा संसर्ग झालेला सातवा रुग्ण आढळला आहे. 45 वर्षीय महिलेला झिका विषाणूचा संसर्ग झाल्याचा अहवाल प्रयोगशाळेनं दिला असून तिला सौम्य लक्षणे आहेत. यापूर्वी निदान झालेल्या पाच महिलांपैकी दोन गर्भवती असल्याची माहिती महापालिकेच्या आरोग्य विभागानं दिली आहे.राज्यात झिका विषाणू संसर्गाचे रुग्ण आढळल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्रिय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानं सर्व राज्यांना मार्गदर्शक सूचना पाठवल्या आहेत. या विषाणूचा गर्भवती महिलेला संसर्ग झाल्यास गर्भाच्या वाढीवर आणि मेंदूच्या कार्यक्षमतेवर परिणाम होऊ शकतो त्यामुळे वैद्यकीय चिकीत्सकांना काटेकोर देखरेख ठेवण्याबाबत दक्ष राहण्यास सांगावं अशी सूचना मंत्रालयानं केली आहे. रुग्णालयांनी देखरेख ठेवण्यासाठी विशेष अधिकारी नेमावा, परिसर एडिस डासापासून मुक्त ठेवण्यासाठी उपाययोजना कराव्यात, प्रतिबंधात्मक उपायांबाबत जनजागृती मोहीम राबवावी, विषाणूसंसर्ग वेळीच ओळखून त्याचा प्रसार रोखावा, सतर्क राहून सर्व वैद्यकीय सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध असल्याची खात्री करावी अशा सूचनाही आरोग्य मंत्रालयानं केल्या आहेत.

नीती आयोगाच्या संपूर्णता अभियानाची सुरुवात आज आयोगानं आकांक्षित म्हणून जाहीर केलेल्या धाराशिव जिल्ह्यातून होणार आहे.  आरोग्य, कृषी, शिक्षण आणि पायाभूत सुविधा इत्यादी क्षेत्रातल्या सुधारणांसाठी हे अभियान राबवण्यात येणार असून यात परांडा तालुक्यावर विशेष भर असणार आहे.

धाराशिवचे जिल्हाधिकारी डॉक्टर सचिन ओंबासे या अभियानामागचा उद्देश सांगताना म्हणाले

,उद्देश हाच आहे की ,लाभार्थ्यांना 100 टक्के लाभ मिळवून देण , जी पॅरामीटर्स आहेत शैक्षणिक , आरोग्य आणि शेती विषयक त्याबद्दल लाभ मिळवून देणे , आणि मानवी विकासासाठी प्रयत्न करण....

दरम्यान नांदेड जिल्ह्यात किनवट इथं काल जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या हस्ते संपूर्णता अभियानाचा प्रारंभ करण्यात आला. याअंतर्गत शालेय विद्यार्थ्यांना सायकल वाटप करण्यात आलं. सायकल मिळाल्यामुळे होणाऱ्या लाभांविषयी सांगताना स्नेहा कोल्हे ही विद्यार्थिनी म्हणाली,

मला सायकल मिळाल्यामुळे शाळेत येण सोप झालं त्यामुळे आमचा टाइम पण वाचतोय आणि अभ्यासाला टाइम मिळाला आजकाल चा जमाना माहीतच आहे कसा आहे त्यामुळे सायकल मिळाल्याने खूप सोपं झालं आणि अभासाला टाइम पण मिळाला.....

**मुख्यमंत्री लाडकी बहीण**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी आवश्यक प्रमाणपत्र देणं, अर्ज भरुन घेणं यासह या संपूर्ण प्रक्रियेत महिलांची अडवणूक, प्रक्रियेत दिरंगाई किंवा योजनेच्या लाभासाठी महिलांकडून पैशांची मागणी करत असल्याचं निदर्शनास आल्यास अशा अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशा सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या आहेत.

**वारकरी विमा**

राज्य सरकारकडून सर्व वारकऱ्यांचा विमा काढला जाईल. तसंच वारीतल्या वाहनांना येत्या 21 जुलैपर्यंत पथकर माफ असेल, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. ते काल विधीमंडळाच्या आवारात वार्ताहरांशी बोलत होते.

**भैरप्पा - कन्नड साहित्यिक**

तत्वज्ञानाचा अभ्यास केलेला असल्यानं भारतीय शाश्वत मूल्यं माझ्या लेखनाचा गाभा असल्याचं मत ज्येष्ठ कन्नड साहित्यिक संतेशिवरा भैरप्पा यांनी काल पुण्यात  व्यक्त केलं. पाच दशकांच्या साहित्यिक योगदानाचा आढावा घेणाऱ्या प्रकट मुलाखतीत भैरप्पा बोलत होते. भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेत आयोजित या कार्यक्रमात 92 वर्षांचे भैरप्पा यांचा पुणेरी पगडी आणि सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

**क्रिकेट**

टी-ट्वेंटी विश्व करंडक क्रिकेट स्पर्धेत अजिंक्य ठरलेला भारतीय संघ थोड्याच वेळापूर्वी नवी दिल्ली इथं पोहोचला. यावेळी त्यांचं स्वागत करण्यासाठी पहाटेपासूनच क्रिकेटप्रेमी तरुण विमानतळावर जमले होते. यानंतर या संघाचं मुंबईमध्येही स्वागत करण्यात येणार आहे. या स्पर्धेत एकही सामना न गमावता भारतीय संघ अजिंक्य राहिला.

**हवामान**

राज्यात आज सर्वत्र पावसाची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. किनारपट्टीच्या भागात सोसाट्याच्या वाऱ्यांसह पाऊस पडण्याचा इशारा विभागानं दिला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**